CNR NO. MHPU02-000061-2026

दाखल दिनांक : ०२/०१/२०२६
नोंदणी दिनांक : ०५/०१/२०२६
निकाल दिनांक : ०४/०७/२०२६
कालावधी : वर्षे महिने दिवस
००   ०६   ०२

१९ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पुणे यांचे न्यायालयात
(पिठासीन न्यायाधीश श्रीमती. एस. एन. हुरगट)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६/२०२६ निशाणी क्रं. ३४.

१. **सौ. राजश्री विक्रम वैद्य,**
वय – ३६ वर्षे, व्यवसाय – नोकरी व गृहिणी,

२. **सौ. स्नेहल गणेश भोसले,**
वय – ३४ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,

३. **शुभम राजेंद्र ताजने,**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

४. **दिव्या राजेंद्र ताजने,**
वय – २४ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

५. **श्री. शेखर दत्तात्रय भुजबळ,**
वय – ५२ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
सर्व रा.– घर नं. १२९/११९८,
गोखले नगर, पुणे – ४११ ०१६. .... **अर्जदार.**

**विरुध्द**

**निरंक.**

.... **गैरअर्जदार.**

**अर्ज मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळणेबाबत.**

---

**श्री. एम. ए. नांगरे, विद्वान विधीज्ञ अर्जदारांकरीता.**

---

**न्यायनिर्णय**

(निकाल जाहीर दिनांक ०४ जुलै, २०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ५ यांनी वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ यांची आजी – कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ या दिनांक २८/०६/२०१३ रोजी पुणे येथे मयत झाल्या. तसेच, अर्जदार क्र. १ यांचे आजोबा कै. दत्तात्रय सावळाराम भुजबळ हे दिनांक ०८/०८/२००२ रोजी पुणे येथे मयत झाले. कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचा मोठा मुलगा संजय दत्तात्रय भुजबळ हे दिनांक १८/०५/१९९९ रोजी पुणे येथे मयत झाले. अर्जदार क्र. ५ शेखर दत्तात्रय भुजबळ हे कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचा दुसरा मुलगा असुन तो अविवाहित आहे. कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांची मुलगी कै. सुनिता राजेंद्र ताजने या दिनांक २७/०६/२०२० रोजी पुणे येथे मयत झाल्या. तसेच कै. सुनिता राजेंद्र ताजने यांचे पती कै. राजेंद्र शंकरराव ताजने हे दिनांक २८/०५/२०२४ रोजी पुणे येथे मयत झाले. कै. राजेंद्र शंकरराव ताजने यांना अर्जदार क्र. १ व २ विवाहित मुली आहेत. कै. राजेंद्र शंकरराव ताजने यांना

अर्जदार क्र. ३ शुभम राजेंद्र ताजने हा मुलगा आहे. कै. राजेंद्र शंकरराव ताजने यांना अर्जदार क्र. ४ अविवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या व्यतिरीक्त मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांना इतर कोणीही वारस नाहीत. तरी, सदर अर्ज मंजूर करुन वारसाहक्क प्रमाणपत्र अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या नावे देण्यात यावे अशी विनंती केली आहे. मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांच्या नावे खालील वर्णन केलेली मिळकत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| १ | मौजे शिवाजीनगर मधील गोखले नगर, जि. पुणे येथील पुणे महानगर पालिका हद्दीतील सर्वे नं. ९८ व ९९, सि.टी.एस. नं. ३०२० व ३०२१ मधील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकारी क्षेत्रातील पुरग्रस्त वसाहतीमधील चाळ नं. १२९ घर/गाळा नं. ११९८ मधील बैठे गाळे त्यासी एकुण प्लॉट क्षेत्र ४५.३८४ चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र २५.७५ चौ.मी. बिल्टअप येणेप्रमाणे मिळकत क्र. पी./४/१६/०३३०२०००. |

३. सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर वृत्तपत्र ‘पुण्यनगरी’ दिनांक ०२ एप्रिल, २०२६ मध्ये जाहिर प्रगटन देऊन नोटीस काढण्यात आली. परंतू सदर जाहिर नोटीस देऊनही ‘अर्जदारांचे हक्कात वारसाहक्क प्रमाणपत्र देण्यात येऊ नये’ असा कोणताही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

४. सदर अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे निर्माण झाले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ५ यांनी हे सिध्द केले काय की, ते वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत ? | **होकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

५. सदरहु अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार यांनी अर्जदार क्र. १ – श्रीमती. राजश्री विक्रम वैद्य यांचे साक्षीदार क्र. १ म्हणुन पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१४ द्वारे दाखल केले. तसेच, अर्जाच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ. क्रं. | कागदपत्रांचे विवरण | दिनांक | कागदपत्रांचे स्वरुप | नि.क्रं. |
|---|---|---|---|---|
| १ | कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचे मृत्यू दाखला | २८/०६/२०१३ | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **१७** |
| २ | कै. दत्तात्रय सावळाराम भुजबळ यांचे मृत्यू दाखला | ०८/०८/२००२ | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **१८** |
| ३ | कै. संजय दत्तात्रय भुजबळ यांचे मृत्यू दाखला | १८/०५/१९९९ | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **१९** |
| ४ | कै. सुनिता राजेंद्र ताजने यांचे मृत्यू दाखला | २७/०६/२०२० | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **२०** |
| ५ | कै. राजेंद्र शंकरराव ताजने यांचे मृत्यू दाखला | २८/०५/२०२४ | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **२१** |
| ६ | अर्जदार क्र. १ ते ५ यांचे आधार कार्ड | – | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **२२ ते २६** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | अर्जदार क्र. १ ते ५ यांचे पॅन कार्ड | – | मुळ प्रत (स्कॅन प्रत) | **२७ ते ३१** |
| ८ | कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांच्या नावाने असलेला मुळ रेशन कार्ड | – | साक्षांकित प्रत (स्कॅन प्रत) | **३२** |

अर्जदार यांनी **नि.क्र. ३३** वर पुरशिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला.

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>** –

६. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता व साक्षीदार क्र.१ — सौ. राजश्री विक्रम वैद्य यांचा साक्षीपुराव्याची न्यायचिकित्सा करीता हे स्पष्ट होते की, मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ हे अर्जदार क्र.१ ते ४ यांचे आजी होते, अर्जदार क्र. ५ यांची आई होती. अर्जदारांशिवाय मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांना इतर कोणीही वारस नाहीत. कै. ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र पाहता ते दिनांक २८/०६/२०१३ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. तसेच सदर प्रकरणात जाहिर नोटीस 'पुण्यनगरी' या वर्तमानपत्रातुन काढण्यात आली. परंतू सदर अर्जदारास वारसाहक्क प्रमाणपत्र देऊ नये म्हणुन कोणीही हरकत घेतलेली नाही.

७. नोंदकरण्याजोगी बाब म्हणजे वारसाहक्क प्रमाणपत्र हे मिळकतीवरील मालकी दर्शवत नाही. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे नावे वारसाहक्क प्रमाणपत्र देण्यास हरकत घेतलेली नसली तरीही पटलावरील पुराव्याचे न्यायचिकित्सा करता हे स्पष्ट होते की अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचे वारस आहेत व ते सर्व कायदेशीर मान्यतेप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब,

अर्जदार क्र. १ ते ५ यांचे नावे कायदेशीर मान्यतेप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र देणे कायदेशीररित्या क्रमप्राप्त आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र. २ बाबत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत – ठकुबाई दत्तात्रय भुजबळ यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या नावे वारसाहक्क प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २ प्रमाणे आवश्यक ते न्यायालयीन शुल्क घेऊन देण्यात यावे. |
| ४. | हा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित केला. |

SHILPA NITESH HURGAT
Digitally signed by SHILPA NITESH HURGAT
Date: 2026.07.04 17:34:11 +0530

**(श्रीमती. एस. एन. हुरगट)**

दिनांक – ०४/०७/२०२६

१९ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पुणे.

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : जी. बी. मिड्डा, |
| न्यायालयाचे नाव | : श्रीमती. एस. एन. हुरगट<br>१९ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पुणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०४/०७/२०२६ |

........................